मा. संपादक, दैनिक                    यांस खालील बातमी प्रसिध्दीस देणे

ही विनंती.

राशीन ता. २६ - राशीन.

## '' राशीन येथें २००० पारध्यांचा भव्य मेळावा ''

राशीन येथे रविवार दि. २६-४-८१ रोजी युक्रांद - जनता - लोकदल यांचे पुढाकाराने वर्षानुवर्षे उपेक्षित असणा-या पन्नासे पारधी समाजाचा राज्य व्यापी मेळावा या भागाचे लोकप्रिय नेते व माजी आमदार लोकदलाचे डॉ. कुमार सप्तर्षी यांचे नेतृत्वाखाली भरला होता. मेळाव्याचे अध्यक्षस्थान जी.प. सदस्य जनता पक्षाचे नारायणराव मोरे यांचे कडे होते.

प्रास्ताविकांत युवक क्रांतीदलाचे प्रकाश जनान यांनी पारध्यांकडे बघायाचाही दृष्टीकोन समाजाने बदलावा कारण पारधी म्हणजे चोरच असे जे गृहित झाले आहे ते चुकीचे आहे. कुठेंही चोरी झाली तरी ज्या ज्या ठिकाणी पारधी दिसतील मग ते गुन्हेगार असोत वा नसोत त्यांना विनाकारण पकडले जाते. या अध्यक्षांनी [उत्कर्ष, त्यांनी] सांगितले की मागच्या वर्षात राशीन भागांत शिलेबिडूक मोटारच्या च-याच चो झाल्या होत्या. त्या चो-या याच भागांतील काही पुढा-यांकडेच सापडल्या मग त्यावेळी पोलिसांनी सर्व [illegible] पुढा-यांना का पकडले नाही ?

डॉ. सप्तर्षी यांनी बोलतांना सांगितले की पारधी समाज सर्वच बाबतींत उपेक्षीत राहिला गेला त्याला शिकला समाज व शिकले शासनकर्तेच जबाब्दार आहेत. ती पण माणसेंच आहेत. त्यांना माणुसकीने वागविलें पाहिजे. त्यांना सुधारणे अवघड नाही पण त्यांना संधी द्यायला पाहिजे. पारधी हा जन्मतःच आरोपी म्हणून जन्माला येवून त्याला जन्मभर आरोपीच्याच पिंज-यांत उभें रहावे लागते. कोर्ट कचेरी पोलीसस्टेशन हें त्यांच्या पाचवीला पुजल्याप्रमाणेच आहे. या बरोबरच त्यांनी पारध्यांना आपल्या हक्कांबरोबर कर्तव्याची काटे कोरपणे पालन करण्याचे सांगितले. राशीनचे पोलीस पाटील शिवाजी राजेभोसले यांनी तर पारध्यांनी चोरी सोडली तर स्वतःची खासगी जमीन वापरायला देण्याचे कबूल केले.

मेळाव्यांत अनेक पारधी अन्याय पीडितांनी विशेषतः विशेषतः पारधी स्त्रियांनी त्यांच्या परिस्थितीबद्दल अति करुणपणे आपल्या होणा-या हालअपेष्टांबद्दल माहिती सांगितली. या मेळाव्याचे वैशिष्ठय म्हणजे या मेळाव्यांत ९९ टक्के स्त्रियाच होत्या व बोलण्यातही स्त्रियाच पुढें होत्या पुरुष पारध्यांनी तर सांगितलें की, आम्ही कितक्या दिवस चो-या केल्या दरोडे घातले पण तरी शेवटी आम्ही सुधारलो नाही

उलट आमची मानहानी झाली. आम्ही चोऱ्या करतो त्यावेळी आम्हाला त्याच भागांतील पुढाऱ्यांच्या आश्रयानेच चोऱ्या कराव्या लागतात. व त्यांत त्यांना वाटा द्यावा लागतो पण पुढारी मात्र पापात भागीदार होत नाहीत. शेवटी शिक्षा आम्हालाच भोगावी लागते. मग त्यांत आमचे असलेच होत नाही व चोरी केली तरी तिचा सर्व फायदा आम्हालाच मिळतो असे नाही तर, आम्ही ज्या पुढाऱ्यांच्या आश्रयाला राहतो त्यांना व पुन्हा पोलीस, जमादार, हवालदार यांचेही फावते. व मग ती चोरी आम्हाला परवडत नाही म्हणून तो किमान न परवडणारा धंदा म्हणून का होईना चोरी सोडली पाहिजे. काहींनी तर गाजीच्या मावसाची शपथ घेऊन चोरी सोडल्याचे सांगितले. कारण गाजीच्या मावसाची शपथ म्हणजे फारच मोठी व महत्वाची शपथ समजली जाते. आम्ही चोऱ्या सोडतो पण पोट कसे भरावे हे सांगा असेही काही पारध्यांनी भाषणात नमूद केले. अध्यक्ष श्री. नारायणराव भोरे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, मला पारध्यांचा फार दया येते व त्यांना सुधारण्यासाठी सर्व मामान्यांनी सह-कार्य करण्याचे आवाहन केले.

या मेळाव्यात खालील मागण्या करण्यात आल्या.
१) आम्हाला रहायला घर द्या २) आम्हाला जमिनी द्या. ३) शिक्षणासाठीं आम्हाला विशेष सवलती द्या ४) आम्हाला पोलिसांपासून संरक्षण व गुन्हेगारांना शासन द्या. ५) नोकरीत योग्यते प्रमाणे स्थान द्या. वि. या मेळाव्यासाठी सातारा, कोल्हापूर, फलटण, बारामती, सोलापूर, करमाळा, नगर, वित्यादी भागांतून मिळून सुमारे २००० हजार पारधी जमले होते. हा मेळावा भरवला म्हणून विरोधकांनी हे लोक चोरांना सामील झाले, हे चोरांना जवळ करायला लागले वित्यादी अपप्रचार केला.

या मेळाव्याच्या संयोजनासाठीं युक्रांदचे प्रकाश बजाज, दत्तू जाधव, शहाजी घोडके, विठ्ठल चौगुले चंद्रकांत थोरात, राम साळवे यांनी कष्ट घेतले. तसेच नगर जिल्हा जनता पक्षाचे सेक्रेटरी श्री. अल्लाउद्दीन काझी यांनीही कष्ट घेतले. या मेळाव्यांत करमाळ्याचे आनंद कोठडिया यांनीही हजर राहून मार्गदर्शन केले.

शेवटीं पारधी समाजाचा मुख्य कार्यकर्ता श्री. लंड्या दत्तरे काळे व शंकर भोसले यांनी पाहुण्यांचे व प्रतिष्ठितांचे हार घालून नारळ देऊन स्वागत केले.

आपला

महाराष्ट्र युक्रांद कार्यकारिणी सदस्य

प्रकाश बजाज.